**महाराष्ट्र शासन**

**<u>न्यायालयीन प्रकरण/तात्काळ</u>**
sopr८.rdd-mh@nic.in
दुरध्वनी क्र. ०२२-२२०७२०४१

क्रमांक:- न्यायप्र-२०१८/प्र.क्र.३५१/बांध-३
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-०१.
दिनांक :- २५ ऑक्टोबर, २०१८.

**प्रति,**

**जिल्हाधिकारी (सर्व)**

**विषय :** शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्र. जिपर-२०१८/प्र.क्र.३३५/बांधकाम-३, दि. ०६.१०.२०१८ ला स्थगिती देण्याबाबत.

**संदर्भ :** मा. उच्च न्यायालय, नागपूर यांचे दि. १७.१०.२०१८ चे अंतरिम आदेश.

शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, दि. ०६.१०.२०१८ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेकडील लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ या अंतर्गत प्राप्त होणा-या निधीतून इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांच्या कामांना मंजूरी देवून सदर कामांच्या अनुषंगाने कार्यान्वयीन यंत्रणा निवडण्याबाबत जिल्हयाच्या पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय समिती गठीत करण्यात आली आहे.

२. सदर शासन निर्णयाच्या विरोधात श्री. रमेश दयाराम डोंगरे, अध्यक्ष, जि.प. भंडारा यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र. ६९९२/२०१८ दाखल केली आहे. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दि. १७.१०.२०१८ च्या आदेशान्वये संदर्भीय दि. ०६.१०.२०१८ च्या शासन निर्णयास स्थगिती दिली आहे. सबब पुढील आदेश होईपर्यंत सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात येत आहे.

(प्रकाश वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-** (१) विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहितीसाठी
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना कार्यवाहीसाठी अग्रेषित